# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ E-mail: ronagpur.dte@gmail.com

फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३ Web Site :- www.rdtenagpur.org.in


**अतिमहत्त्वाचे**

क्रमांक :- तंशिस/विकाना/ईबीसी/२०१५/ 1223

दिनांक:- 24 APR 2015

प्रति,

संचालक/प्राचार्य,
खाजगी व कायम विनाअनुदानित संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

**विषय:- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कांच्या ५० टक्के प्रतिपुर्तीबाबत.**

संदर्भ:- संचालनालयाचे पत्र क्रं. १५/अर्थस/ईबीसी/वाटप/२०१५/०८अ, दि. २३ एप्रिल २०१५

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे मागील वर्षातील विद्यापीठ/मंडळाच्या परिक्षेनुसार गुणपत्रिकेतील एकूण गूण (**Total Aggregate Marks**) विद्यार्थ्यांस मिळालेले गुण (Total Marks Obtained) आणि टक्केवारी (**Percentage**) तसेच आधार कार्ड व आधार कार्डशी संलग्नित असलेल्या बँक खात्याची माहिती संस्थाप्रमुखांनी **दि. १५ मे २०१५** पर्यंत संचालनालयाच्या **www.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावरील **EBC Scholarship** प्रणालीमध्ये **Update Aadhaar, Bank and Last Year Result Details** या लिंकवर जाऊन अद्यावत करण्यात यावी. तसेच संस्थानी संकेतस्थळावरून अहवाल डाऊनलोड करून त्याची प्रमाणित हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीसह **दि. २० मे २०१५** पर्यंत या कार्यालयास जमा करण्यांत यावी. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीची रक्कम जमा करणेबाबतची कार्यवाही तात्काळ करणे सुलभ होईल.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांच्या फी प्रतिपुर्तीची रक्कम शासनांने वरीलप्रमाणे नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसारच करणे आवश्यक आहे. या व्यतीरिक्त पुर्वीप्रमाणे रक्कम संस्थांना वितरीत केली जाणार नाही. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांची माहिती संगणक प्रणालीवर नोंदविण्यांत येणार नाही अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीची रक्कम मिळणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील.

**सहपत्र:- संदर्भिय पत्र.**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहितीकरीता मानार्थ सादर.